**सोपेकॉम, मकाम आणि टाटा सामाजिक विज्ञान संस्था आयोजित एकदिवसीय चर्चासत्र**

# ‘शेती क्षेत्रातील महिलांवर होणारा हिंसाचार’

**दिनांक १६ फेब्रुवारी २०२४, ‘चिंतन सभागृह’ वनामती, नागपूर**

‘शेती क्षेत्रातील महिलांवर होणारा हिंसाचार’ हे एक दिवसाचे विभागीय चर्चासत्र सोपेकॉम (पुणे), महिला किसान अधिकार मंच (मकाम), आणि टाटा सामाजिक विज्ञान संस्था (मुंबई) ह्यांनी दिनांक १६ फेब्रुवारी २०२४ रोजी ‘वनामती’, नागपुर येथे आयोजित केले होते. या चर्चासत्रास नागपूर विभागातील विविध संस्था-संघटनांचे प्रतिनिधि, महिला शेतकरी, विशेष कक्षातील सामाजिक कार्यकर्ते, उपस्थित होते. त्यासोबतच सरकारी यंत्रणेमधील अधिकारी सुद्धा चर्चासत्रामध्ये सामील झाले होते, सर्व मिळून एकूण १२० सदस्य उपस्थित होते.




विभागीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनाच्या सत्रास अध्यक्षस्थानी ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी श्रीमती लीलाताई चितळे होत्या, तर उद्‌घाटक म्हणून महिला आयोगाच्या सदस्य मा. आभा पांडे उपस्थित होत्या. मान्यवरांनी रोपाला पाणी घालून आणि सोपेकॉम ने केलेल्या अभ्यासातील अकोला-यवतमाळ जिल्हाच्या अहवालाचे प्रकाशन करून चर्चासत्राचे उद्‌घाटन केले. चर्चासत्राचे प्रास्ताविक सोपेकॉम आणी मकामच्या सीमा कुलकर्णी यांनी केले. त्या म्हणाल्या की, शेतकरी महिलांना विविध प्रकारच्या हिंसेचा सामना करावा लागतो जसे की संपत्तीत अधिकार नसणे, समान मजुरी न मिळणे, शेतकरी म्हणुन ओळख नसणे इत्यादी. तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या “कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, निषेध आणि निवारण) कायदा, २०१३” या कायद्याअंतर्गत महिला शेतकऱ्यांना दाद मागण्याची संधी नाही, ह्यासारखे बरेच मुद्दे त्यांनी पुढे ठवले.



त्यानंतर आभा पांडे यांनी त्यांचे विचार मांडले. आयोजकांचे अभिनंदन आणि शुभेच्छा देत त्यांनी त्यांचे महिलांसोबत सुरु असलेल्या कामाचे अनुभव सांगितले. त्यातील महिलांच्या कौटुंबिक हिंसाचाराबद्दल बोलताना त्यांनी विदर्भातील अनेक जिल्ह्यातील उदाहरणे दिली. शेतकरी महिलांना विशाखा समिती आणि इतर महिलांशी संबंधित समित्या, यंत्रणा काय ह्याबद्दल अधिक माहिती अजूनही नाही. महिलांना त्यांच्या सुरक्षिततेसाठी असलेल्या यंत्रणा आणि कायदे माहिती असणे गरजेचे आहे कारण स्त्री जर सुरक्षित राहिली तरच आदर्श समाज घडू शकतो, असे मत त्यांनी मांडले. पुढे त्या म्हणाल्या की महिलांसोबत काम करीत असताना शेतकरी महिलांकडे विशेष लक्ष त्यांनी दिले नाही. परंतु या चर्चासत्राच्या माध्यमाने त्यांना शेतकरी महिलांचे प्रश्न सुद्धा कळण्यास मदत झाली आणि त्या महिला आयोगाची सदस्य म्हणून ते प्रश्न पुढे मांडतील. शेतीमध्ये महिलांवर होणारी हिंसा या विषयवार महिला आयोग पुढाकार घेईल असे आश्वासन त्यांनी दिले.



त्यानंतर, सोपेकॉम आणि मकामने ‘शेती मधील अरिष्ट आणि महिलांवर होणारा हिंसाचार’ ह्या विषयावर केलेल्या अभ्यासातून समोर आलेल्या निष्कर्षांची मांडणी स्नेहा भट ह्यांनी केली. तसेच, प्रतिभा गजभिये यांनी टाटा सामजिक विज्ञान संस्थेच्या स्पेशल सेलच्या तीन वर्षांच्या कामाचा गोषवारा मांडला. सोपेकॉम ने केलेला अभ्यास लक्षात घेत चर्चासत्राच्या अध्यक्ष लीलाताई चितळे यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात महिला शेतकरी आणि इतर उपस्थितांना संविधान वाचवण्यासाठी आवाहन केले. सर्व उपस्थितांना एक नवा जोश लीलाताईंनी दिला. सत्राचा समारोप मकामच्या शुभदा देशमुख यांनी केला.

**सत्र दुसरे : महिलांवर कामाच्या ठिकाणी होणारा हिंसाचार**



दुसऱ्या सत्रात ‘महिलांवर कामाच्या ठिकाणी होणारा हिंसाचार’ या विषयावर मांडणी करण्यात आली. शेतकरी महिला प्रतिनिधी शालू कोल्हे यांनी मासेमारी करणाऱ्या महिलांना सन्मानाने जगण्यासाठी जो दैनंदिन संघर्ष करावा लागतो आणी हिंसा सहन करावी लागते हे स्वतःच्या अनुभवांमधून मांडले. ज्योती नगरकर यांनी त्यांच्या मांडणीत ग्रामीण शेतकरी महिलांसाठी २०१३ चा कायदा कसा उपयोगात आणता येइल या विषयी काही मुद्दे मांडले.



ॲड स्मिता सिंघलकर यांनी 'महिलांवर कामाच्या ठिकाणी होणारा हिंसाचार' कायद्याची सविस्तर माहिती दिली. गाव पातळीवर बचत गटात देखील समित्या स्थापन केल्या जाव्यात असे त्यांनी मांडले. नूतन माळवी यांनी संघटीत क्षेत्रात देखील 2013 च्या कायद्यांतर्गत महिलांना दाद मिळत नाही असे स्वतःच्या अनुभवातून सांगितले.

तसेच शुभदा देशमुख यांनी सत्राचा समारोप करताना ग्रामसभेअंतर्गत तक्रार समितीची स्थापना करण्यात यावी असे मत ठेवले. सोबतच सध्याच्या स्थानिक समित्यांच्या मर्यादा देखील मांडल्या. जिल्हाधिकारी कार्यालय जे २०१३ च्या कायद्याची अंमलबजावणी करणारे कार्यालय आहे तिथेच याबाबत किती उदासीनता आहे याचे वर्णन करीत अनुभव मांडले.

**सत्र तिसरे : महिलांवर होणारा कौटुंबिक हिंसाचार**



तिसरे सत्र हे 'महिलांवर होणारा कौटुंबिक हिंसाचार' या विषयावर होते. सर्वप्रथम, रुबिना पटेल यांनी मुस्लिम स्त्रीयांवर होणारी हिंसा या बाबत मांडणी केली. त्यानंतर विशेष कक्ष भंडारा आणि युवा रुरल असोसिएशन च्या मृणाल मुनेश्वर यांनी घरगुती हिंसेच्या केसेस मांडल्या. माधुरी खडसे यांनी कायदा न्याय देईल याची वाट न पाहता महिलांनी स्वतः कसे उपाय शोधले पहिजे याची अनेक उदाहरणे मांडली.



तसेच, कल्पना नैताम आणि समता मेसकर यांनी त्यांच्यावर झालेल्या हिंसेचे अनुभव मांडले. त्यासोबतच, सत्रात महिला व बाल विकास च्या विभागीय उपायुक्त श्रीमती अपर्णा कोल्हे यांनी विभागाच्या योजनांची माहिती दिली व विभाग महिलांसाठी सतत कार्यरत राहील असे आश्वासन दिले. सुवर्णा दामले यांनी सत्राचा समारोप केला.

**सत्र चौथे: पुढील दिशा**




समारोपीय आणि चर्चासत्राचे शेवटचे सत्र हे, 'पुढील दिशा' काय असायला पाहिजे या अनुषंगाने निश्चित केले होते. यामध्ये महिला संघटनांच्या प्रतिनिधींनी त्यासंबंधी मांडणी केली. महिला राजसत्ता अंदोलनाच्या अर्चनाताई, दलित महिला संघटनेच्या छायाताई खोब्रागडे, संघर्ष वाहिनीच्या रंजनाताई व हिंसा मुक्ती परिषदेच्या सुनीता बागल यांनी मांडणी केली. महिलांना संपत्तीत अधिकार, समान कामास समान वेतन, शेती व महिला याबाबत एक समर्पक धोरण, शेतीच्या सध्याच्या भांडवली मॉडल ला पर्याय, ग्रामसभेमध्ये तक्रार समितीचे गठन व त्यात सर्व समाजाच्या

महिलांचे प्रतिनिधित्व, बजेट मध्ये महिला हिंसाचार रोखण्यासाठी तरतूद, इत्यादी सूचना आल्या. ह्यामधील काही प्रमुख सूचना पुढील प्रमाणे होत्या

- महिला शेतकऱ्यांकरिता विशेष शेती सहाय्य धोरण आखले जावे.
- महिलांना स्वावलंबी करण्यासाठी स्कील ट्रेनिंग आणि जेंडर बाबत ही ट्रेनिंग घेण गरजेचे आहे.
- कसेल त्याची जमीन या कायद्या अंतर्गत महिलांना जमिनीवर अधिकार कसे मिळतील या दृष्टीने कार्य करायला पाहिजे.
- गावपातळीवर महिलांवर होणाऱ्या हिंसाचार विरोधी समिती होणे गरजेचे आहे. आणि त्या कमिटीचे सातत्याने वैचारिक बांधणीचे प्रशिक्षण होणे गरजेचे आहे.
- सरकारी- निमसरकारी समित्यांचे दर २-३ वर्षांनी मुल्यांकन केले गेले पाहिजे.
- ट्रान्स व्यक्तिंसाठी कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक हिंसाचार बाबत कमिटी होणे आवश्यक आहे.
- शेतकरी आणि शेतमजुर शुक्रवार, 31 मे 2024महिलांचे संघटन बांधले गेले पाहिजे.
- आदिवासी महिलांचे स्वतंत्र बजेट असावे.
- बजेटमध्ये महिलांसाठी 50 टक्के भागीदारी असायला पाहिजे.
- पीडित महिलांच्या मुलांचे शिक्षण सरकारी खर्चातुन व्हावे.
- भटक्या विमुक्त जमातीच्या महिलांना सुरक्षेच्या हेतूने  विशेष  सुरक्षा कवच योजना स्वरूप तयार करावे.
- जबरणजोत शेती (नियमानुकुलीत झालेल्या अतिक्रमित सार्वजनिक जमिनी उदा. गायरान जमीन, वन जमीन इत्यादी) व गावठाण जमिनीवरील घर/ शेती महिलांच्याच नावाने व्हावी.
- मेंढपाळ/ गौरक्षक  पशुपालक महिलांना मोबाईल सुरक्षा योजना तयार व्हावी.
- महिला शेतकऱ्यांना कृषि उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी)/ बाजारपेठेत जागा मिळावी व थेट विक्री करण्याची परवानगी मिळावी.
- महिला आणि पुरुष यांना मजुरीचा भाव समान असावा.
- महिला सुरक्षा गार्ड यांच्यासाठी विशेष योजना आणाव्या.
- महिला अत्याचारातील निकाल व कौटुंबिक न्यायालयाचे निकाल जलद गतीने व्हावे.

सत्राचे समारोप सीमा कुलकर्णी यांनी ठराव मांडून केले. त्यात बिल्किस बानो, खेळाडू महिला, व मणिपुर मधील महिला यांना पाठिंबा जाहिर केला. तसेच वरील सर्व सूचनांवर काम करण्यासाठी एक समिती गठण करावी आणि त्यांचा पाठपुरावा करावा असे एकमताने ठरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोपेकॉमच्या स्वाती सातपुते ह्यांनी केले आणि शेवटी सोपेकॉमच्या ऋचा वसुमती सतीष ह्यांनी आभार मानले.

